Vivekanand Shikshan Sanstha's

**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**

Samarthnagar, Aurangabad.

---

Date :

# PRESS RELEASE

## "विवेकानंद महाविद्यालयामध्ये परिसर मुलाखतीचे आयोजन"

येथील विवेकानंद कला सरदार दलीपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर श्याम शिरसाठ आणि संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.अशोक गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली "रोजगारभिमुख" कार्यक्रमांतर्गत माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपनीच्या वतीने मराठवाड्यामधील विद्यार्थ्यांकरिता परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते.या परिसर मुलाखतीकरिता ७०० विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करून प्रत्यक्ष मुलाखती दिल्या.या परिसर मुलाखतीकरिता Mphasis कंपनीचे अधिकारी श्री.सरफराज खान आणि श्री.अश्रफ सय्यद यांनी विद्यार्थ्यांच्या तीन टप्प्यामध्ये परीक्षा घेऊन पात्र ४१ विद्यर्थ्यांची प्रत्यक्ष निवड केली. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना कंपनीच्या वतीने तात्काळ निवडपत्र देण्यात आले.निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीच्या वतीने वार्षिक १,८०,००० ते २,५०,००० वेतन जाहीर करण्यात आलेले आहे.या परिसर मुलाखतीच्या यशस्वितेकरिता महाविद्यालयाचे Traning and Placement Officer श्री.वैभव तायडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.अक्षय भाऊ शिसोदे,उपाध्यक्ष श्री.अमरभाऊ शिसोदे,कोषाद्याक्ष श्री.तुषार भाऊ शिसोदे सचिव श्री.श्रीमंतराव शिसोदे ,सहसचिव डॉ.यशोद पाटील,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रोफेसर श्याम शिरसाठ, विवेकानंद शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री.प्रभाकर मोरे व संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.अशोक गायकवाड यांनी कौतुक केले.

